ARTHA - Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २२ | पुणें, बुधवार तारीख २७ फेब्रुवारी, १९५७ | अंक ९

## विविध माहिती

**हैद्राबाद शहरांतील रिक्षा**—हैद्राबाद शहराच्या कॉर्पोरेशननें शहरांतील ६,००० सायकल रिक्षांची नोंद करण्याचें ठरविलें आहे. मध्यवर्ती सरकारच्या आदेशाप्रमाणें ह्यापूर्वी माणसाच्या बळानें चालविल्या जाणाऱ्या ९,००० रिक्षांची नोंद करण्यांत आली होती. अशा प्रकारच्या रिक्षांना नवे परवाने नाकारण्याची सूचना करण्यांत आली होती.

**नवीन बोटींची बांधणी**—ईस्टर्न अँड वेस्टर्न शिपिंग कॉर्पोरेशन ह्या सरकारी मालकीच्या बोट-वहातूक कंपनीनें आधुनिक पद्धतीच्या ९ बोटी बांधण्याची मागणी विशाखापट्टम् येथील हिंदुस्थान शिपयार्ड कंपनीकडे नोंदविली आहे. ९ बोटींपैकी एक बोट प्रवासी व माल ह्या दोन्हींची वहातूक करण्यासारखी बांधण्यांत येणार आहे.

**दक्षिण आफ्रिकेंतील बहिष्कार**—दक्षिण आफ्रिकेंतील आफ्रिकन नॅशनल काँग्रेसनें आफ्रिकन लोकांच्या आर्थिक व राजकीय तक्रारी वेशीवर टांगण्यासाठी शहरांतील बसेसवर बहिष्कार घातला आहे. बहिष्कार सुरू होऊन ७ आठवडे झाले आहेत. तीन शहरांतून चालण्यांत आलेला बहिष्कार आतां आणखी एका शहरांतून सुरू करण्यांत आला आहे.

**विश्वकिरणांचें संशोधन**—विश्वकिरणांचा जिवंत प्राण्यांवर काय परिणाम होतो तें पहाण्यासाठी रशिअन शास्त्रज्ञांनीं कांहीं कुत्रीं एका अग्निबाणाच्या टोंकात ठेवून तो ६० मैल उंचीवर सोडला होता. कुत्रीं ठेवलेली खोली सुटी होऊन तीन तास वरच्या वातावरणांत फिरत होती. कुत्र्यांवर कांहीं विपरीत परिणाम झाल्याचें दिसलें नाहीं.

**म्हैसूर राज्यांतील बंदरें**—म्हैसूर राज्याचे गव्हर्नर ह्यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, राज्यांतील बंदरांचा विकास करण्याचा व त्यांच्याकडे जाणाऱ्या रेल्वे-मार्गांचा विस्तार करण्याचा विचार चालू आहे. म्हैसूर राज्यांत उत्तर कानडा भागांत कारवार, भटकल, कुमठा व होनावर हीं चार बंदरें आहेत. राज्यांत विजेचा प्रसार करण्याचाहि सरकारचा विचार असल्याचें त्यांनीं सांगितलें.

**केरळसाठी बँकिंग कॉर्पोरेशन**—केरळमधील बँकनोकरांच्या संघटनेनें भारताच्या अर्थमंत्र्यांना अशी विनंती केली आहे कीं, केरळ राज्याच्या उपयोगासाठी एका बँकिंग कॉर्पोरेशनची तावडतोब स्थापना करण्यांत यावी. संकल्पित कॉर्पोरेशनचें कामकाज आयुर्विमा कॉर्पोरेशनप्रमाणें चालावें असेंहि सुचविण्यांत आलें आहे.

**लिपझिग येथील औद्योगिक जत्रा**—पूर्व जर्मनींत लिपझिग ह्या शहरीं मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत एक जंगी औद्योगिक जत्रा भरविण्यांत येणार आहे. परदेशीय हुंडणावळ मिळविण्यासाठी भारत ह्या आंतरराष्ट्रीय जत्रेंत मोठ्या आस्थेनें भाग घेणार आहे.

**इजिप्तच्या कापसाचीं गिऱ्हाइकें**—कापसाच्या चालू हंगामांत रशिआनें इजिप्तकडून सर्वांत अधिक कापूस विकत घेतला आहे. रशिआच्या खालोखाल झेकोस्लोव्हाकिआ, इटली, अमेरिका, ब्रिटन व फ्रान्स ह्या देशांचे अनुक्रम लागतात. इजिप्तच्या कापसाची गणना जगांतल्या उत्तम प्रतीच्या कापसांत होते.

**अमेरिकेला पोलंडचें शिष्टमंडळ**—पोलंडच्या सरकारचें एक प्रतिनिधि-मंडळ अमेरिकेला गेलें आहे. अमेरिका व पोलंड ह्यांच्या दरम्यानचे आर्थिक हितसंबंध अधिक विस्तृत पायावर उभारण्यासाठी अमेरिकेच्या प्रतिनिधींशीं ते वाटाघाटी करणार आहेत. पोलंडच्या अर्थखात्याचे डायरेक्टर मंडळाचे पुढारी आहेत.

**कोळशाची नवी खाण**—सिंगाराणी कोळशाच्या खाणीच्या टापूंत कोळशाची एक नवीन खाण उपलब्ध झाली आहे. खाणींतून दरमहा १०,००० टन कोळसा निघूं शकेल असा अंदाज आहे. ही खाण प्रत्यक्ष चालू होण्यास अद्याप ६ महिन्यांचा अवधी लागेल. खाण चालू झाल्यावर तींत ८०० कामगारांना रोजगार मिळेल.

**भारतीय निवडणुकांचें निरीक्षण**—भारताच्या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकांचें निरीक्षण करण्यासाठी नेपाळचे मुख्य निवडणूक-अधिकारी उत्तरप्रदेशांत आले आहेत. त्यांच्या बरोबर ४० अधिकारी असून त्यांना निवडणुकींचें शिक्षण देण्यासाठी मतदानकेंद्रावर पाठविण्यांत येणार आहे. येत्या ऑक्टोबरमध्यें नेपाळमधील निवडणुका आहेत.

**मंगलोर येथें भुयारी गटारें**—म्हैसूरच्या सरकारनें मंगलोर शहरांतील सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी भुयारी गटारें बांधण्याची योजना मंजूर केली आहे. ह्या कामासाठी १ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. त्याचप्रमाणें पाण्याच्या पुरवठा करण्याची योजनाहि मंजूर झाली आहे.

**निष्कलंक पोलादाचा खप**—भारतामधील निष्कलंक पोलादाचा खप वाढत असून आतां दरसाल ७,००० टन पोलाद परदेशांतून आयात करावें लागतें. ह्या धंद्याशीं संबंध असलेल्या कारखानदारांकडून अशी मागणी करण्यांत येत आहे कीं भारत सरकारनें दरसाल १०,००० टन निष्कलंक पोलाद तयार करण्याचा कारखाना काढावा.

**यवतमाळ येथें सिमेंटचा कारखाना ?**— यवतमाळ जिल्ह्यांतील राजुर ह्या गांवीं सिमेंटचा कारखाना काढण्याचा मुंबई सरकारचा विचार आहे. ह्या भागांतील उद्योगपतींनीं कारखान्याविषयीं आस्था दाखविली तर सरकार त्यांना शक्य ती सर्व मदत करण्यास तयार आहे, असें समजतें. कारखान्यासाठी जरूर ती पहाणीहि सरकार करील.

**मद्रासजवळ वाघिणींचा कारखाना**—मद्रासमधील एका कंपनीनें संथ रुळावर चालणाऱ्या वाघिणींचा कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. कारखान्यासाठी १ कोटी रुपयांचें भांडवल लागेल. सुमारें दोन महिन्यांत प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ होईल. दरसाल १,००० मालवाहू डबे तयार करण्यांत येतील. कारखान्यांत ६०० कामगारांना रोजगार मिळेल.

**नागपूर येथें मध्यवर्ती कचेऱ्या**—मध्यवर्ती सरकारनें आपल्या विविध खात्यांना उद्देशून एक पत्रक काढलें आहे. शक्य असेल त्या कचेऱ्या नागपूर येथें हलविण्याविषयीं खातेप्रमुखांना सांगण्यांत आलें आहे. राज्यपुनर्रचनेनंतर नागपूरमधील बऱ्याच मोठमोठ्या इमारती रिकाम्या राहिल्या आहेत. दिल्लींत जागेची टंचाई आहे.

**जेसलमीर भागांत तेल**—राजस्थानांतील जेसलमिर भागाची भारतीय भूगर्भशास्त्रज्ञांनीं पहाणी केली असतां त्या भागांत खनिज तेल सांपडण्याची शक्यता दिसून आली. परदेशीय तज्ज्ञांनीं अद्यावत् साधनांनीं केलेल्या पहाणींतहि वरील अनुमानाला दुजोरा मिळाला आहे. पाकिस्तानला लागून असलेल्या थर वाळवंटाचा हा एक एक विभाग आहे.

**पन्ना येथील हिऱ्याच्या खाणी**—मध्यप्रदेशांतील पन्ना येथें असलेल्या हिऱ्यांच्या खाणींचें उत्पादन भारतीय सरकार आपल्याकडे घेणार आहे. त्यासाठी एक स्वतंत्र कॉर्पोरेशन स्थापन करण्यांत येणार आहे. सध्यां ब्यूरो ऑफ माइन्सतर्फे कामास प्रारंभ करण्यांत आला आहे. खाणींतून दरसाल २,००० कॅरट वजनाचे हिरे हल्लीं निघूं शकतात.

**रेल्वेचीं विजेवर चालणारीं एंजिनें**—भारताचें रेल्वेबोर्ड विजेवर चालणारीं रेल्वेचीं एंजिनें देशांत तयार करण्याची योजना आंखीत आहे. विजेची भारी यंत्रसामुग्री तयार करण्याचा कारखाना उभारण्यांत आल्यावर एंजिनें तयार करणें सोपें जाईल. एंजिनांचे यांत्रिक विभाग चित्तरंजन येथील कारखान्यांत बनविण्यांत येतील.

**आर्थिक दंडयोजनेसाठी जाहिरात**—अमेरिकेंतील 'न्यूयॉर्क टाइम्स' ह्या दैनिकांत एक मोठी जाहिरात प्रसिद्ध करण्यांत आली आहे. संयुक्त-राष्ट्र-संघटनेचे ठराव न मानल्याबद्दल इस्राइल राष्ट्राविरुद्ध आर्थिक दंडयोजना करण्यांत आली तर तशीच दंडयोजना रशिआ व भारत ह्यांच्याविरुद्धहि करण्यांत आली पाहिजे अशी मागणी जाहिरातींत करण्यांत आली आहे.

## मुंबई सहकारी कायद्याखालील लवादांपुढील कामांस लिमिटेशन कायदा लागू नाहीं

मुंबई सहकारी कायद्याच्या ५४ व्या कलमाखालील लवाद-निर्णय हा विधानविहित असल्यानें त्याला आर्बिट्रेशनच्या कायद्याचें ३७ वें कलम लागूं पडत नाहीं. सहकारी कायद्याखाली नेमलेल्या लवादांपुढील कामांस लिमिटेशनचा कायदा लावता येत नाहीं.

सावित्रा खंडू हा पवळे, ह्याच्या मार्फत नगर ॲग्रि. सेल अँड परचेस को. सोसायटीशीं कांहीं व्यवहार करीत असे. पवळेकडे सोसायटीचे १०५१ रु. ५ आ. ६ पै एवढे येणें राहिलें आणि तें देण्याची सावित्रा खंडूनें जबाबदारी पत्करली. १९४९ मध्यें त्यानें कांहीं रकमा भरल्या, परंतु ६११ रु. ५ आ. ६ पै एवढी बाकी राहिली.

२९ नोव्हेंबर, १९५२ रोजीं सोसायटीनें असिस्टंट रजिस्ट्रारकडे कर्जवसुलीच्या हुकुमासाठी अर्ज केला. सहकारी कायद्याच्या ५४ व्या कलमाप्रमाणें वाद आर्बिट्रेटर्सकडे निवाड्यासाठी सोंपविण्यांत आला. तीन वर्षांचे आंत सोसायटीनें आपल्या वसुलीबाबत तक्रार नोंदवली नाहीं, म्हणून ती मुदतींबाहेर गेली आहे असें सावित्रा खंडूनें प्रतिपादन केलें. बोर्डानें सोसायटीचें येणें शाबीत धरलें; तें मुदतींबाहेर गेलें नाहीं असें ठरविलें. बॉंबे को. ट्रायब्यूनलनें रिव्हिजनमध्यें, "सहकारी कायद्याच्या ५४ व्या कलमाखालील आर्बिट्रेशनच्या कामांना लिमिटेशनचा कायदा लागत नाहीं" असा निवाडा केला. तेव्हां सावित्रा खंडूनें घटनेच्या २२७ व्या कलमाखाली मुंबई हायकोर्टाकडे अर्ज केला.

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

"इंडियन लिमिटेशन ॲक्ट हा दावे, अपिलें व ॲप्लिकेशन ह्यांना लागूं आहे. आर्बिट्रेटरपुढील काम हें वरील तीनांपैकी कशांतहि बसत नाहीं. दुसरें असें कीं, लिमिटेशनची मुदत संपून गेली, तरी वसुलीचा हक्क नाहींसा होत नाहीं; कोर्टामार्फत वसुली घडवून आणण्याचा मार्ग फक्त त्यानें बंद होतो. तेव्हां, कोर्टामध्यें जी मागणी लिमिटेशनच्या कायद्यामुळें करतां येणार नाहीं, त्या मागणीचा विचार आर्बिट्रेटरलाहि करतां येणार नाहीं असा अर्थ होत नाहीं, तथापि आर्बिट्रेशनच्या कायद्याच्या ३७ व्या कलमानें म्हटलें आहे कीं त्या कायद्याच्या तरतुदी आर्बिट्रेशन्सनाहि लागू पडतील. परंतु, त्याच कायद्याच्या ४६ व्या कलमानें स्टॅच्युटरी (विधानविहित) आर्बिट्रेशन्सच्या बाबतींत ३७ वें कलम स्पष्टपणें वगळलें आहे. सहकारी कायद्याच्या ५४ व्या कलमाखालील आर्बिट्रेशन हें स्टॅच्युटरी आर्बिट्रेशन आहे. तेव्हां, त्याला वरील ३७ वें कलम लागूं पडत नाहीं. म्हणून सहकारी कायद्याखाली नेमलेल्या बोर्ड ऑफ आर्बिट्रेटर्सनीं त्यांचे पुढील कामास लिमिटेशनचा कायदा लावण्याचा नाहीं. ह्यासाठी नगर सेल अँड परचेस को. सोसायटीचें येणें मुदतींबाहेर आहे, ह्या बचावास कायद्याचा आधार नाहीं."

तमाम दंतरोगांवर

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# अर्थ

बुधवार, ता. १७ फेब्रुवारी, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## जपानच्या उद्योगधंद्यांचें यशस्वी पुनरुजीवन

दुसऱ्या महायुद्धांत झालेली अपरिमित हानि भरून काढून जपानच्या उद्योगधंद्यांनीं आपलें बस्तान पुन्हां व अधिक विस्तृत पायावर बसविलें आहे. त्यामुळें भारत व जपान ह्यांच्यांतील औद्योगिक व व्यापारी संबंधाचें स्वरूपहि बदललें आहे. आतां जपान जगाच्या बाजारपेठांतून बोटी, कापड व यंत्रसामुग्री ह्यांची वाढत्या प्रमाणावर निर्यात करूं लागला आहे. मुंबईच्या ग्रेट ईस्टर्न शिपिंग कंपनीला जपाननें १२,००० टन वजनाची एक मालवाहू बोट नुकतीच विकत दिली असून भारताकडून अशुद्ध लोखंड आयात करण्याच्या वाटाघाटी सध्यां चालू आहेत. जपानच्या पोलादाच्या कारखान्यांना लोखंडाची माती बाहेरून आयात करावी लागते. स्वतःला लागणाऱ्या बोटी तर जपान बांधीत आहेच; पण दुसऱ्या देशांसाठी त्या बांधण्याची उत्पादनक्षमताहि जपानच्या कारखान्यांपाशीं आहे. कापडाच्या आशिआंतील व आफ्रिकेमधील बाजारपेठांतून भारताची जपानशीं जोराची स्पर्धा होते. पण, रेशमाच्या कापडाच्या बाबतींत जपान भारताच्या पुढें आहे. जपानच्या यंत्रसामुग्रीची भारताला अधिकाधिक गरज लागू लागली आहे. कारण ती पश्चिम युरोपांतील राष्ट्रांकडून मिळणाऱ्या यंत्रसामुग्रीपेक्षा पुष्कळदा स्वस्त असते. शिवाय, ती अधिक सुलभतेनें मिळूहि शकते. जपानमधील लोकांचें रहाणीचें मान सुधारत असतांनासुद्धां जपानची यंत्रसामुग्री स्वस्त कां असते? पूर्वी ब्रिटिश कारखानदार असें म्हणत असत कीं, जपानच्या कामगारांची निकृष्ट राहणी व कामगार संघटनेचा अभाव ह्यांच्यामुळें जपानला माल स्वस्त देणें परवडतें.

ह्या बाबतींत ब्रिटनमधील 'मँचेस्टर गार्डिअन' ह्या पत्राच्या जपानमधील वार्ताहरानें पाठविलेली माहिती उद्बोधक आहे. तो म्हणतो कीं, युरोपिअन कामगारांच्या तुलनेनें जपानी कामगारांची उत्पादनक्षमता अद्याप कमीच आहे. जपानमधील ७० टक्के उद्योगधंदे अजूनहि तांत्रिकदृष्ट्या मागासलेले असे आहेत. एक ब्रिटिश कामगार जितकें काम करील, तितकें काम करण्यास तीन जपानी कामगार ठेवावे लागतात. तथापि, जपानमधील कामगारांचें वेतन अल्प आहे. कारण, बेकार कामगारांचा पुरवठा आहे आणि कामावर असलेले कामगार ठरल्या वेळेपेक्षा अधिक काम करण्यासाठी जास्त दरानें वेतन मागत नाहींत. जपानमधील कामगारांच्या संघटनाहि भलत्याच मागण्या करीत नाहींत. जपानमधील बहुतेक कारखानदार आपल्या कामगारांसाठी घरें, फराळगृहें, कामावर जाण्यायेण्याची व्यवस्था, वैद्यकीय मदत, ह्यांची सोय करतात. दर दोन वर्षांनीं नफा झाला असेल त्या मानानें कामगारांना रोख बोनसहि देण्यांत येतो. कामगारसंघटना ह्या व्यवस्थेनें समाधान पावलेल्या आहेत. जपानच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकीं ४७ टक्के उत्पन्न पगार व रोजगार ह्यांच्या रूपानें आतां वांटण्यांत येत आहे. १९४० सालीं ह्या रीतीनें ३६ टक्के उत्पन्नच वाटलें जात असे. जपानमधील दरमाणशीं उत्पन्नांतहि वाढ होत आहे. जपानच्या मालकीच्या वसाहती नाहींत आणि देशाची लोकसंख्या अन्नाच्या उत्पादनाच्या तुलनेनें अधिक प्रमाणांत वाढत आहे. त्यामुळें भांडवली मालाची निर्यात करून अन्नाची आयात जपानला करावी लागते. म्हणून चीन व भारत ह्यांसारख्या बाजारपेठांची जपानला फार गरज आहे.

---

## अमेरिकेची मदत नीट वापरली जात नाहीं

अमेरिकेकडून पाकिस्तानला मिळणाऱ्या आर्थिक मदतीचे प्रमुख अधिकारी मि. जॉन बेल ह्यांनीं पाकिस्तान सरकारच्या आर्थिक कारभाराबद्दल गंभीर स्वरूपाची तक्रार केली आहे. सिंध हैदराबाद येथें एका प्रसंगीं बोलतांना ते म्हणाले कीं, पाकिस्तान सरकारला आपल्या शेतीचा विकास करतां यावा म्हणून अमेरिकेकडून तांत्रिक मदत करण्यांत येत आहे. पण, ह्या मदतीचा उपयोग अधिकांत अधिक करून घेण्यांत येत नाहीं. पाकिस्तान देशांत उपलब्ध असलेली साधनसामुग्री योग्य रीतीनें उपयोगांत आणीत नाहीं. अशा परिस्थितींत अमेरिका व इतर देशांकडे सालोसाल मदत मागत बसण्यांत कांहीं अर्थ उरलेला नाहीं. दुसऱ्या देशांकडून मदत घेत बसण्यानें पाकिस्तानचे आर्थिक प्रश्न सुटणार नाहींत. काय वाटेल तें करून देशांतील शेतीचें उत्पादन योजनाबद्ध रीतीनें वाढविण्यांत आलें पाहिजे. शेतीच्या उत्पादनाच्या बाबतींत जी माहिती बाहेर आली आहे त्यावरून देशांतील अन्नधान्यविषयक गंभीर परिस्थिति उघड होत आहे. ही परिस्थिति अशीच चालू ठेवली गेल्यास सिंधू नदीचें खोरें ५० वर्षांच्या आंतच वाळवंटानें भरलेलें दिसेल. दुष्काळ, पूर अगर इतर नैसर्गिक प्रकोपामुळें आणीबाणीची परिस्थिति उत्पन्न झाली तर तिला तोंड देण्यासाठीं देशाबाहेरून साह्य मिळण्याची अपेक्षा करणें योग्य होईल. पण नेहमींच अन्नधान्याची टंचाई व ती दूर करण्यासाठी धान्याची आयात करण्याची भाषा योग्य ठरणार नाहीं. शेतकऱ्यानें मिळविलेल्या परदेशीय चलनाचा असा उपयोग करणें गैर आहे. देशांतील उत्पादन वाढविणें हाच खरा मार्ग आहे.

---

## सरकारी खर्च कमी करा

"सरकारी खर्चाच्या ॲक्सिलरेटरवर एक पाऊल ठेवून पतपुरवठ्याच्या ब्रेकवर दुसरें पाऊल ठेवल्यानें, देशाचा आर्थिक गाडा नीट चालणार नाहीं. येत्या कांहीं वर्षांपुरतां तरी विचार करून, देशाला परवडेल एवढ्या मर्यादेंत खर्च राखला जाईल, अशाच योजना सरकारनें आखल्या पाहिजेत. सरकारी खर्चाला कोठें कात्री लावावी, हें मध्यवर्ती बँकेनें सुचवावयाचें नसून, तो राजकीय दृष्टीचा विचार आहे. परंतु, देशाच्या साधनसंपत्तीवर बेसुमार भार टाकणाऱ्या सरकारी व निमसरकारी खर्चाबद्दल भयसूचना देणें, हें मध्यवर्ती बँकेचें कर्तव्य आहे."

बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर, मि. कॅमेरॉन कॉबॉल्ड, ह्यांचें कॉव्हेन्ट्री चेंबर ऑफ कॉमर्सच्या बैठकीमधील भाषण.

## चहानें मिळविलेली परदेशीय हुंडणावळ

भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी लागणारा भांडवली माल परदेशांतून आयात करण्यांत येणार आहे. पण हा माल विकत घेण्यासाठी जरूर असणाऱ्या परदेशीय हुंडणावळीची टंचाई भासत आहे. म्हणून निर्यात वाढविण्याचे प्रयत्न सरकारतर्फे करण्यांत येत आहेत. चहा ही एक अशी वस्तू आहे कीं तिच्या निर्यातीमुळें भारताला परदेशीय हुंडणावळीचा मोठ्या प्रमाणावर लाभ होतो. १९५६ सालापुरतें पाहावयाचें झाल्यास चहाच्या निर्यातीनें भारताच्या परदेशीय हुंडणावळींत १४० कोटी रुपयांची भर पडली असें दिसून येतें. १९५६ सालीं भारतानें ५१·६ कोटी पौंड चहा निर्यात केला. १९५५ सालीं ३६·४ कोटी पौंड चहा निर्यात करण्यांत आला होता. गेल्या वर्षीं भारताचा निर्यात व्यापार यथातथाच चालला होता. पण चहानें मात्र आघाडी मारलेली दिसते. भारतीय चहाची सर्वांत अधिक निर्यात ब्रिटनला करण्यांत आली. भारतानें ब्रिटनला ३५·४५ कोटी पौंड चहा निर्यात केला. त्याची किंमत सुमारें ९० ते ९५ कोटी रुपये झाली. १९५५ सालीं भारतानें ब्रिटनला २४·८९ कोटी पौंड चहा निर्यात केला होता. त्याची किंमत सुमारें ७३·२ कोटी रुपये झाली होती. कॅनडानें भारताकडून २·२ कोटी पौंड चहाची खरेदी केली. त्याची किंमत ६ कोटी रुपये झाली. आयर्लंडनें भारताकडून १·४८ कोटी पौंड चहा खरेदी केला व त्यासाठी ३·५ कोटी रुपये दिले. त्याशिवाय ऑस्ट्रेलिआ व इजिप्त ह्या देशांनींहि भारतीय चहा घेतला. आंतरराष्ट्रीय बाजारपेठांत चहाला चांगली किंमत येत होती. भारतीय सरकारनेंहि निर्यात वाढविण्याच्या दृष्टीनें जकातीचा उपयोग केला.

## पुढे पाऊल

ले.: श्री. वा. काळे, प्रकाशक: श्री. वा. काळे, दुर्गाधिवास, पुणें ४, मूल्य: रु. २, पृष्ठें: १३१.

व्यक्ति, कुटुंब व समाज ह्यांच्या गरजा पुष्कळदां विरोधी असतात. त्यांचा मेळ कसा घालावा, दैनंदिन गृहजीवन सुव्यवस्थित आणि सुखी कसें करावें, हें लेखकानें सोळा लेखांतून दाखविलें आहे. निरनिराळीं उदाहरणें देऊन एकंदर विवेचन मनोरंजक केलें आहे. हें पुस्तक वाचून त्यांतील बोधाचा उपयोग दैनंदिन जीवनांत केल्यास सामाजिक जीवन अधिक सुव्यवस्थित व सुखी होईल.

"अमृत", फेब्रुवारी, १९५७

**प्रामाणिक खेड्यांचा गौरव**—मध्यवर्ती समाजहित बोर्डाच्या अध्यक्ष श्रीमती दुर्गाबाई देशमुख ह्यांनीं अहमदाबाद जवळील एका खेड्यांतील रहिवाशांच्या प्रामाणिकपणाचा गौरव म्हणून २,५०० रुपयांचें बक्षीस दिलें. ह्या खेड्यांत एका खुल्या जागीं कार्डें व पाकिटें ठेवण्यांत आलीं होतीं. गांवकऱ्यांनीं जरूर तें साहित्य घेऊन पैसे पेटींत टाकावयाचें होतें. हा प्रयोग दोन महिने चालू होता.

**सीलोनला अमेरिकेची मदत**—सीलोनमधील विकास-योजनांना आर्थिक मदत देण्याचे चार करार अमेरिकन सरकार व सीलोनचें सरकार ह्यांच्यांत झाले आहेत. अमेरिका सीलोनला चालू वर्षांत एकूण ७० लाख डॉलर्सची मदत देणार आहे. मदतीचा उपयोग करून रस्ते, पाटबंधारे, कारखाने, इत्यादि कामें करण्यांत येतील.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २.

जरी प्रकटे सिद्ध सरस्वती । तरी मुख्या आधी भारती ।
पथ वस्तु सामर्थ्य शक्ति । नवल कायी ॥ —श्रीज्ञानेश्वरी

हजार टनांची मशिनरी हीच ती वस्तुसामर्थ्य शक्ति.

चालू हंगामांत फेब्रुवारी १९५७ अखेर

**एक लक्ष दहा हजार ( १,१०,००० ) पोतीं साखर होईल.**

**एप्रिलअखेर गळित चालेल**

व

**अपेक्षेप्रमाणें १,६०,००० पोतीं उत्पादन होईल.**

१९५५-५६ चा ताळेबंद व अहवाल भागीदारांकडे रवाना झाला. त्याप्रमाणें शेअरवर १० टक्के डिव्हिडंड देण्याची संचालकांची शिफारस.

ठेवींच्या व्याजाचे दर :

| मुदत | १ वर्ष | ३ वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| व्याजाचा दर | ६ टक्के | ७ टक्के | ७॥ टक्के. |

९८० सदाशिव पेठ,
लक्ष्मीपथ, पुणें २.
दिनांक २५-२-१९५७

जगन्नाथ महाराज पंडित
अध्यक्ष,
संचालक मंडळ

## हिंदी विज्ञानछंदाचें प्रकाशन

### औचित्यपूर्ण विज्ञान-गीत

लोकविज्ञान मंडळाच्या द्वारां प्रसिद्ध होणाऱ्या हिंदी 'विज्ञानछंद' ह्या विज्ञानविषयक सुबोध हिंदी मासिकाच्या प्रथमांकाचा प्रकाशनसमारंभ श्री. सत्यकामजी विद्यालंकार, संपादक "साप्ताहिक धर्मयुग" ह्यांच्या हस्तें दि. १७ रोजीं झाला. 'स्व-यंत्र निर्मिति जोंपर्यंत नाहीं, तोंवर स्वतंत्रता बेगडी राहील; स्वतंत्र भारत शास्त्र-सज्ज झाल्याविना तो शस्त्रसज्ज होणार नाहीं' हें मार्मिकपणें वर्णन करणारें एक गीत त्या वेळीं श्री. विश्वास काळे ह्यांनीं भावपूर्वक गायिलें, तें उपस्थितांना अत्यंत आवडलें. ह्या परिणामकारक विज्ञानगीताचे कवि श्री. हरिभाऊ जोगळेकर, डिप्. टेक्. हे आहेत.

### ॥ स्वयंत्र-निर्मिति नसे तोंवरी स्वतंत्रता बेगडी ॥

विज्ञान-गीत

[ हिंदी "विज्ञान-छंद" मासिकाच्या प्रथमांक प्रकाशन समारंभासाठी रचलेलें गीत ]

( कवि : श्री. हरिभाऊ जोगळेकर, डिप. टेक्. पुणें २. )

विज्ञानाचे 'छांदिक' जनहो हांक तुम्हां तांतडी।
स्वयंत्र-निर्मिति नसे तोंवरी स्वतंत्रता बेगडी ॥ ध्रु ॥

यंत्र-युगाची जगतामध्यें आज असे पूर्णिमा।
भारतामधें यांत्रिकतेचा कां न दिसे चंद्रमा ? ।
विज्ञानाच्या स्वयंप्रकाशित तारांगणिं घ्या उडी।
स्वयंत्र-निर्मिति नसे तोंवरी स्वतंत्रता बेगडी ॥ १ ॥


दास्यशृंखला तुटल्या, गेलें परकें अनुशासन।
परी न फिटलें यंत्रयुगाचें लोहमयी बन्धन।
यंत्रास्तव कां परदेशांचें पदवंदन हरघडी।
स्वयंत्र-निर्मिति नसे तोंवरी स्वतंत्रता बेगडी ॥ २ ॥

शस्त्रसज्ज हा स्वतंत्र भारत, शास्त्रसज्ज ना परी।
नव्या युगाचा नव्या मनूचा मंत्र जपा झडकरी।
मायबोलिच्या माध्यमांतुनी शास्त्र शिकूं या घडी।
स्वयंत्र-निर्मिति नसे तोंवरी स्वतंत्रता बेगडी ॥ ३ ॥

**बँकाक येथें हिंदी इस्पितळ**—बँकाक येथील हिंदी नागरिकांनीं जरूर तो निधि जमवून शहरांत एक प्रसूतिगृह स्थापन केलें आहे. इस्पितळाला बाह्य रुग्ण विभागहि जोडण्यांत आला आहे. इस्पितळाचें नांव 'नानक मिशन हॉस्पिटल' असें ठेवण्यांत आलें असून तें सर्व नागरिकांना खुलें आहे.

**रेल्वेएंजिनांची संख्या**—३१ मार्च, १९५६ ह्या दिवशीं भारतीय रेल्वेवर धावणाऱ्या एंजिनांची शिरगणती करण्यांत आली असतां त्यांची एकूण संख्या ९,१६२ इतकी आढळून आली. त्यापैकीं ९,०१६ वाफेवर चालणारीं, ७९ विजेचीं व ६७ तेलावर चालणारीं होतीं. सर्व एंजिनें ओळीनें लावल्यास ४० मैल रेल्वेमार्ग अडेल.

**भारत-इंडोनेशिआ व्यापार**— भारत व इंडोनेशिआ ह्यांच्यांत १९५३ सालीं झालेल्या व्यापारी कराराची मुदत चालू सालच्या जूनपर्यंत वाढविण्यांत आली आहे. ह्या व्यापारांत भारताच्या बाजूनें अनुकूल तफावत आहे. १९५५ सालीं भारतानें ११ कोटी रुपयांचा माल निर्यात केला व १·६ कोटी रुपयांचा आयात केला.


कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक :—श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ






## तांत्रिक व धंदेशिक्षणाच्या शाळांबाबत अपेक्षा

बेनन स्मिथ कमर्शिअल हायस्कूल (बेळगांव), च्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे वेळीं अध्यक्ष श्री. गो. वि. सराफ बी. ए., एलूएल्. बी., चेअरमन, बेळगांव बँक लि., ह्यांनीं केलेलें भाषण.

व्यापारी किंवा धंदेशिक्षणाच्या शाळा उघडण्याची शिफारस सन १८८२ मध्येंच हंटर कमिशननें केली. त्यानंतरहि अशा शिफारशी करण्यांत आल्या परंतु ब्रिटिश सरकारनें या दिशेनें पाऊल टाकण्याचें मनावर घेतलें नाहीं. १९३७ सालीं अॅबटवुड रिपोर्टानुसार मात्र अशा प्रकारच्या शिक्षणक्रमासाठी पद्धतशीर शिक्षणक्रम देणाऱ्या शाळांची उभारणी करण्यास सुरवात केली. तरी प्रगतीची गति मंदच होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्या सरकारकडून पहिल्या पंचवार्षिक योजनेंतच अशा प्रकारच्या व मुख्यतः तांत्रिक शिक्षणाच्या शाळा व्यापक प्रमाणांत चालू केल्या आहेत हें योग्यच केलें आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत या दिशेनें बरेंच पुढचें पाऊल पडणार यांत शंका नाहीं. आपल्या शिक्षणसंस्थेनें ही व्यापारी शिक्षणाची सोय करण्यांत या विभागांत अग्रेसरत्वाचा मान पटकावला हें आपल्या आजपर्यंतच्या उज्ज्वल परंपरेस धरूनच झालें आहे. कारण सन १८३२ सालींच म्हणजे मेकॉलेसाहेबांचा शिक्षणक्रम सुरू होण्यापूर्वी तीन वर्षे आधींच आपली पहिली 'इंग्रजी शाळा' बेळगांवांत सुरू करण्यांत आली.

अशा प्रकारच्या शाळांच्या बाबतींत एक दक्षता घेणें अगत्याचें आहे कीं, त्या देशांतील व्यापारी व औद्योगिक संस्थांच्या गरजा लक्षांत घेऊन त्यांच्या सहकार्यानें चालविणें इष्ट ठरणार आहे. नपेक्षा या संस्थांतून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या उमेदवारांना व्यवसाय मिळविणें सुलभ होणार नाहीं. अनुभव असा आहे कीं, परदेशास जाऊन तांत्रिक शिक्षणाची चांगली लायकी असलेले उमेदवारहि प्रमुख कंपन्यांना पसंत पडत नाहींत व त्यांना व्यवसाय वा नोकरी मिळविणें मुष्कील होऊन बसतें; व शिक्षणक्रम एक व व्यवसाय अन्य, अशीहि विसंगती दिसून येते. बऱ्याच कंपन्या आपल्याकडे नोकरींत असलेल्या इसमानांच जरूर तें तांत्रिक शिक्षण देण्याचें धोरणहि ठेवीत असल्याचें दिसून येत आहे. हीं सर्व परिस्थिति लक्षांत घेऊनच मी ही सूचना करीत आहे.

आज अशा संस्थांची आवश्यकता वाढत्या प्रमाणांत आहे हें कबूल करूनहि साधारण पुस्तकी शिक्षणक्रमांत दिसून येणारे दोषहि येथील विद्यार्थ्यांतहि दिसूं नयेत याकडे लक्ष देणें जरूर आहे. केवळ कोणत्याहि प्रकारची नोकरी मिळविण्यासाठींच शिक्षण घेणें व जुजबी अभ्यासानें जेमतेम पास होऊन नोकरी-करतां अर्ज करणाऱ्यांची संख्या वाढत गेली तर त्यामुळें कार्यक्षमता वाढली किंवा व्यापारी किंवा धंदेशिक्षणाचा प्रसार झाला असें समजणें देशहिताचें होणार नाहीं. निवडलेल्या कामाची मनापासून आवड व तें उत्कृष्टपणें करण्याचे गुण प्रत्येक विद्यार्थ्यांच्या अंगीं बाणणें जरूर आहे. आमच्याकडे नोकरीसाठी जेव्हां अर्ज येतात व त्यामध्यें पदवीधरांचेहि अर्ज असतात, तेव्हां या सर्व अर्जदारांची आम्हीं अगदीं साध्या पण मूलभूत व आवश्यक अशा बाबींची चांचणी घेतों, व ती म्हणजे, हस्ताक्षर सुवाच्य आहे कीं नाहीं यांसाठी शुद्धलेखन, आणि बिनचूक व झटपट बेरजा करणें. आपणांस आश्चर्य वाटेल कीं या चांचणींत फारच कमी अर्जदार लायक ठरतात. या बाबींकडेहि आपल्या विद्यार्थ्यांचें व आपलें लक्ष असलें पाहिजे म्हणूनच मी याचा उल्लेख करीत आहें.

आपण आतां एका मोठ्या लोकशाहीचे घटक आहोंत. तेव्हां सर्वप्रकारच्या शिक्षणक्रमाचा हेतु मुख्यतः या लोकशाहीला लायक असे स्वतंत्र बुद्धीचे, कार्यक्षम, शिस्तीचे व एकमेकांस साहाय्य करण्यास उद्युक्त असलेले नागरिक तयार करणें हाच असला पाहिजे. विशिष्ट शिक्षणक्रमाबरोबर साहित्यिक, कलात्मक व सांस्कृतिक बाबींचाहि अंतर्भाव अभ्यासक्रमांत असणें अगत्याचें आहे. आणि सर्वांपेक्षांहि जास्त महत्त्वाची बाब म्हणजे बौद्धिकदृष्ट्या उद्याचे नागरीक कमीजास्त दर्जाचे तयार होणें साहजिक असले तरी चारित्र्य, शिस्त, कार्यक्षमता व देशहिताची दृष्टि याबाबतींत ते सर्व सारखेच उच्च दर्जाचे व भूषणावह निपजले पाहिजेत. त्यावरच राष्ट्राचें चारित्र्य व भवितव्य अवलंबून आहे. आपल्या संस्थेची उत्तरोत्तर भरभराट होवो हीच सदिच्छा.

### श्री. जे. ए. मदन ह्यांचा मृत्यु

सर जनार्दन आत्माराम मदन हे दि. २१ फेब्रुवारी रोजीं हृदयक्रिया बंद पडून मृत्यु पावले. श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांचें भाषण ऐकून ते घरीं परत जात असतांना, वाटेंत मोटार-गाडींतच त्यांना मृत्यु आला. १९०९ सालीं ते आय. सी. एस्. झाल्यावर असिस्टंट कलेक्टर झाले. कलेक्टर, सहकारी खात्याचे रजिस्ट्रार, शेतकी कमिशनचे एक चिटणीस, प्रांतिक बँकिंग चौकशीसमितीचे चेअरमन, सरकारच्या रेव्हेन्यू खात्याचे सेक्रेटरी, कमिशनर, गव्हर्नरांचे अडव्हायसर, मुंबई पब्लिक सर्व्हिस कमिशनचे चेअरमन, सौराष्ट्र पब्लिक सर्व्हिस कमिशनचे चेअरमन, प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटचे चेअरमन, इत्यादि जागांवरून त्यांनीं महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली होती. सहकारी चळवळीचा एक आस्थेवाईक नेता त्यांचे मृत्यूमुळें नाहींसा झाला आहे.

### प्रांतिक हिंदी वाक्स्पर्धा

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणें द्वारां दरसाल होणाऱ्या प्रांतिक हिन्दी वक्तृत्व-स्पर्धा मार्चच्या तिसऱ्या आठवड्यांत पूर्व खानदेश जिल्ह्यांत होणार आहेत. (निश्चित स्थान लवकरच प्रसिद्ध केलें जाईल.) स्पर्धेत दोन विभाग आहेतः—१ प्रौढ व २ कुमार.

प्रत्येक विभागांत प्रथम येणाऱ्या उमेदवारास संस्थेद्वारां ठेवलेली हिंदी वाक्स्पर्धा ढाल दिली जाईल. याशिवाय पहिल्या तीन उमेदवारांना खालीलप्रमाणें व्यक्तिगत पुरस्कार दिला जाईल.

प्रौढ विभाग : अनुक्रमें रु. ५०, रु. २५, रु. १५.

कुमार विभाग : अनुक्रमें रु. ३०, रु. २०, रु. १०.

स्पर्धेत भाग घेऊं इच्छिणाऱ्यांनीं आपलें आवेदनपत्र ता. १५ मार्चपर्यंत फीसह पाठविलें पाहिजे. स्पर्धेसंबंधींची सविस्तर माहिती, तसेंच आवेदनपत्राकरितां खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा,
राष्ट्रभाषा भवन,
नारायण पेठ, पुणें २.

रा. भि. महाजन
प्रमुख
प्रचार विभाग

## बाजारपेठांचें कामकाज

भारतांतील सध्यांच्या १,८०० शेतकी बाजारपेठांपैकी ५२० बाजारपेठांवर सरकारी नियमन आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत आणखी ५०० बाजारपेठा सरकारी नियंत्रणाखाली आणण्याचा विचार आहे. उत्पादकांचा फायदा व्हावा म्हणून बाजारपेठ पद्धतीवर नियमन व नियंत्रण करण्यासाठी अनेक राज्यांनीं तद्विषयक कायदे संमत केले आहेत. अन्नधान्यें, डाळी, तेलबिया, कापूस, मिरच्या व भाजीपाले यांसारख्या शेतकी उलाढाल अशा बाजारपेठांकडून होत असते.

नियमन असलेल्या या बाजारपेठांचें कामकाज लोकशाही तत्त्वांनीं चालतें. नियुक्त केलेल्या व निवडलेल्या एका बाजारपेठ समितीमार्फत उत्पादक-विक्रेते, दलाल इ. कडून बाजारपेठेचें कामकाज पार पाडण्यांत येतें. या समित्यांत उत्पादकांचें बहुमत असतें आणि अनेक समित्यांचे तर ते अध्यक्षहि असतात. सचोटीच्या व्यापारी पद्धति अंमलांत आणणें, बाजारपेठेचें काम करणारांस परवाने देणें, ठरवून दिलेली बाजारपेठ-आकारणी वसूल करणें, मालाचा खुला लिलांव करण्याची पद्धत सुरू करणें, प्रमाणित वजनें सुरू करणें, इ.ची जबाबदारी या समित्यांवर आहे, मुंबई राज्यांतील सांगलीसारख्या नियमन असलेल्या बाजारपेठेंत बाजारपेठ कर कमी करून ५० टक्क्यांवर आणण्यांत आला आहे. पैशाचा व्यवहार रोखीनें करण्यांत येऊन उत्पादकास व्यवहाराचा तपशील देणारा कॅश मेमो देण्यांत येतो. शेतकऱ्यांना चालू बाजारभाव कळविण्यांत येतात. कांहीं ठिकाणीं आकाशवाणीवरूनहि बाजारभाव सांगण्यांत येतात.

उत्पन्न व पैसा यांतील विषमता कमी करून व ग्रामीण अर्थकारणाचा संपूर्ण विकास घडवून समाजवादी समाजरचना निर्माण करण्याच्या राष्ट्रीय योजनेंतील उद्दिष्टांनुसार शेतकी बाजारपेठेस विशेष महत्त्व देण्यांत आलें आहे. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा निम्मा भाग शेतकी मालांतूनच मिळत असल्यानें सुधारलेल्या बाजारपेठ तंत्रांचे फायदे शेतकऱ्यास मिळावेत हें अगदीं साहाजिकच आहे.

नियंत्रित बाजारपेठेसाठी कायदा प्रथमतः करण्यांत आला तो इ. स. १८८६ मध्यें. हैद्राबादच्या वऱ्हाड भागासाठी तो करण्यांत आला होता. कापूस व धान्य यांची विक्री व खरेदी यावर नियमन करण्यासाठी हा कायदा करण्यांत आला होता. परंतु वस्तुतः तो कापसासच अधिक कडकपणें लावण्यांत येई. कारण, कापूस हें त्यांत विभागांतील पैसा देणारें पीक होतें. तथापि या कायद्यांत एक मोठा दोष असा होता कीं, त्यानुसार बाजारपेठेच्या व्यवस्थेंत शेतकऱ्याला स्थानच नव्हतें. आतां आंध्र, मुंबई, मद्रास, मध्यप्रदेश, म्हैसूर व पंजाब राज्यांत बाजारपेठेच्या नियमासंबंधीं कायदे करण्यांत आले असून त्यामुळें शेतकऱ्यांचा लाभ झाला आहे.

बाजारपेठेंतील व्यवहार सुव्यवस्थित व्हावेत आणि त्यांवर देखरेख करतां यावी म्हणून बहुतेक सर्व समित्यांनीं १० ते १०० एकरांच्या मोकळ्या जागांची सोय केली आहे. या ठिकाणीं उत्पादक व विक्रेत्यांसाठी शेड्स, कॅंटीन्स, पिण्याचें पाणी, टपाल व तार कचेऱ्या इ. ची व्यवस्था करण्यांत आली आहे. बाजारपेठेंतील काम करण्यास जनरल कमिशन एजंटस, व्यापारी, हमाल इत्यादींस समितीनें परवाने दिले आहेत. कामकाजांत मतभेद झाल्यास ते मिटविण्यासाठी एक उपसमिति नेमली आहे या समितीचा चिटणीसहि तें काम करतो. या व्यवहारांत शिस्त व सचोटी यांस प्राधान्य असून व्यापारी व उत्पादक या दोघांसहि त्या सारख्याच लागू आहेत.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय.
विवाहकार्यांची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

मराठी भाषिक सर्वसामान्य जनतेच्या उपयोगाकरितां
नवा हिंदु वारसा कायदा
( १९५६ चा )
लेखक : विठ्ठल रामचंद्र फडके, एम्. ए., एलएल्. बी., वकील ( रि. सि. जज्ज ) पुणें.
हिंदु स्त्री-पुरुषांच्या वारसा हक्कांत, मिळकतीवरील स्त्रियांच्या हक्कांत व मृत्युपत्र करण्याच्या हक्कांत झालेले क्रांतिकारक बदल सोप्या भाषेंत समजावून देणारें हें एकमेव पुस्तक प्रकाशकाकडे व सर्व प्रमुख पुस्तकविक्रेत्यांकडे विकत मिळेल. [ किंमत १। रुपया, शिवाय टपालखर्च ]
प्रकाशक : हे. वि. फडके,
श्रीकृष्णकुंज, ८२० भां. इं. रोड, पुणें ४.

अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्हा. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

### ज्यू लोकसंख्येपैकी निम्मी अमेरिकेंत

जगांतील एकूण ज्यू लोकांची संख्या १,१८,१०,००० एवढी आहे. त्यापैकी निम्मे लोक अमेरिकेंत रहातात. रशिआंत २०,००,००० ज्यू लोक आहेत; इस्राएलमध्यें त्यांची संख्या १५,८५,००० आहे. गेल्या महायुद्धानंतर कॅनडा, ऑस्ट्रेलिया व अर्जेंटिना येथील ज्यूंची संख्या वाढली आहे; इराक, येमेन, चीन, इजिप्त व युरोप येथील कमी झाली आहे.

---

### आठ अमेरिकन विद्यापीठांत संस्कृतच्या अभ्यासाची सोय

अमेरिकेंतील आठ विद्यापीठांत संस्कृत शिकविलें जातें. हारवर्ड, येल, शिकॅगो, कॅलिफोर्निया, प्रेस्टन, कोलंबिया, जॉन्स हॉपकिन्स आणि पेन सिलव्हॅनिया, हीं तीं विद्यापीठें होत.

---

### बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेकडील ठेवीत गेल्या वर्षी २ कोटी रुपयांची वाढ होऊन त्यांची रक्कम ६९·५५ कोटी रु. झाली. दिलेलीं कर्जे ४६·०९ कोटी रुपयांवरून ५७·२१ कोटी रुपयांवर गेलीं. म्हणजे कर्जांचें ठेवींशीं प्रमाण ८१% पडतें.

---

### कॅलेंडरांचें प्रदर्शन

कलकत्ता येथें कॅलेंडरांचें तिसरें आंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरविण्यांत आलें आहे. प्रदर्शनांत २८ देशांनीं भाग घेतला असून सुमारें ३०० कॅलेंडर्स ठेवण्यांत आलीं आहेत. प्रदर्शनांत भारतानें पहिल्यानेंच भाग घेतला आहे.

---

### कराड अर्बन को. बँकेचें तिजोरी घर

कराड अर्बन को. बँक लि. च्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टचा उद्घाटनसमारंभ रविवार, दि. २४ रोजीं बँकेच्या सहकार-मंदिरांत ना. श्री. यशवंतराव चव्हाण, मुंबई राज्याचे मुख्य मंत्रि, ह्यांच्या हस्तें झाला. स्वागतपर पद्यगायनानंतर श्री. बाबुराव गोखले ह्यांनीं स्वागत केलें. संदेशवाचनानंतर चेअरमन श्री. तांबवेकर ह्यांनीं भाषण केलें. ना. चव्हाणांनीं तिजोरी घराचें उद्घाटन जाहीर करून बँकेच्या प्रगतीबद्दल प्रशंसोद्गार काढले.

---

**दिल्ली शहराचा वीजपुरवठा**—दिल्ली इलेक्ट्रिसिटी बोर्डानें शहराचा विजेचा पुरवठा वाढविण्याची योजना तयार केली आहे. दिल्ली शहराला १९६०-६१ पासून भाक्रा-नांगल धरणावर तयार झालेली ४०,००० किलोवॅट वीज मिळूं लागेल. तरीसुद्धां सुमारें ४३,९०० किलोवॅट वीज कमी पडेल अशी भीति व्यक्त करण्यांत येत आहे. बोर्डाच्या योजनेला ४·२८ कोटी रुपये खर्च येईल.

---


## व्याज आकारणीचें पुस्तक

**( विस्तृत जंत्रीसह )**

पाव पै पासून रु. १८-१२-० पर्यंत निरनिराळे पन्नास दरांची एक कोटी कच्च्यापर्यंत आकारणी. व्याज-आकारणी संबंधी उदाहरणांसहित भरपूर माहिती. सर्वप्रकारच्या सहकारी संस्था, बँका, व्यापारी इत्यादींना अत्यंत उपयोगी. सोबत सेंटचा तक्ता. मूल्य दोन रुपये ट. ख. निराळा. पत्ता:—कृ. गो. घाटपांडे, इंदापूर, ( जिल्हा पुणें ).



स्थापना सन १९३५ रे. नं. २६२५१८

## दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, कॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १

( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | | |
|---|---|---|
| संकलित भांडवल | रु. १,००,००० | |
| जमा भांडवल | रु. ९१,००० | |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९०,०००हून अधिक | |
| ठेवी | रु. ६,००,००० | ” |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० | ” |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. भगवंतराव नामदेवराव ढोबळे, (अध्यक्ष)
श्री. गेनुभाऊ गोविंदराव ढोले, ( उपाध्यक्ष )
श्री. उमाकांत भाऊराव तांबे, ( ऑ. मॅ. डायरेक्टर )
श्री. मल्हारराव बाबुराव बेंडे, ( ऑ. ट्रेझरर )
श्री. आनंदराव पांडुजी ढोरे सभासद
श्री. मळीबुवा मार्तंड वामन ”
श्री. गेनुजी लक्ष्मण नलवडे ”
श्री. ज्ञानेश मारुतीराव मनसुख ”
श्री. मनोहर रामजी नेहरकर ”

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.



टेलिफोन नं. २४८३ “तारेचा पत्ता CENCOBANK”

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें शहर

—स्थापना १९१७—

★ लोकशाही राज्ययंत्रणा आणि देशव्यापी नियोजन यांची सांगड घालून समाजवादी अर्थरचना प्रत्यक्षांत आणण्याचा अभिनव प्रयोग आज आपण करीत आहोत.

★ सहकार हा लोकशाही नियोजनाचा प्राण आहे.

★ लोकशाही नियोजनाचें दुसरें पाऊल—दुसरी पंचवार्षिक योजना यशस्वी होण्यासाठीं आपल्या बचतीची गरज आहे.

★ सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या आमच्या बँकेंत आपली बचत गुंतवा आणि भारताच्या दुरुस्तीचे शिल्पकार व्हा.

**खालील बोलके आंकडे बँकेच्या सर्वांगीण प्रगतीची कल्पना देतील.**

| | |
|---|---|
| अधिकृत भागांचें भांडवल | रु. १०,००,००० |
| वसूल भागांचें भांडवल | रु. ९,२५,९५० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. ८,६८,५१८ |
| एकूण ठेवी | रु. १,७६,७९,३१० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. २,०७,९४,४१० |

वा. ग. अळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.